e-news letter

# e जलसेवा Bulletin

Enabling efficient water management
कार्यक्षम जलव्यवस्थापनासाठी

Volume : IV Issue : IV

August 2014

Government of Maharashtra
Water Resources Department

• Editor •
T. N. Munde

• Executive Editor •
Mr. Pravin Kolhe

• Editorial Board •
Mrs. Purnima Desai Mr.Avinash Patil
Mrs. Dhanashree Limaye Mr.Prashant Kadam

**Our Vision** *Transform WRD into modern & service driven department through Information & Communication Technology*

## संपादकीय



ई-जलसेवा प्रकल्पाचा वापर जलसंपदा विभागात जोमाने सुरू असून जलसंपदा विभागाच्या नूतनीकृत संकेतस्थळाला ११ लाखाहून अधिक हिट झालेल्या आहेत. या संकेतस्थाची लिंक देशाच्या राष्ट्रीय पोर्टल india.gov.in वर देखील उपलब्ध झालेली आहे, ही एक महत्त्वाची कामगिरी पार पडलेली आहे. या संकेतस्थळावर राज्यातील मंत्रालय, महामंडळे, प्रादेशिक कार्यालये, मंडळ कार्यालये, विभाग, उपविभाग तसेच सर्व सिंचन शाखा यांचा संघटन तक्ता उपलब्ध करून देण्यात आला असून, भविष्यात आपले कार्यालयाचे संबंधी विविध महत्त्वाची माहिती या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकास जलसंपदा विभागाची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

आपणास कल्पना आहेच की ई-जलसेवा प्रणालीमध्ये भरण्यात आलेल्या माहितीची पडताळणी करून तिचा शासकीय कामकाजात वापर करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित झालेला आहे. याबाबत संपूर्ण राज्यभरातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळतो आहे, हे विशेषत्वाने नमूद करावेसे वाटते.

नूकतीच जल व भूमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद येथे वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांसाठी दोन दिवसांची SWeSO-1 ही विशेष कार्यशाला आयोजित करण्यात आली होती, त्यामध्ये दोन मुख्य अभियंत्यांसह ३१ अधीक्षक अभियंत्यानी सहभाग नोंदविला. या सर्वांच्या चर्चेदरम्यान प्रणालीचा वापर करणे तसेच प्रणालीमध्ये आवश्यक त्या सुधारणा घडवून आणणे याबाबत अतिशय चांगल्या कल्पना प्राप्त झाल्या.

आपणास माहितच आहे की जलसंपदा विभागात काम करत असताना बहुतांश वेळ बैठका व त्यासाठी करावा लागणाऱ्या प्रवासासाठीच जात असायचा व त्यामुळे क्षेत्रीय कामकाजाकडे वेळेअभावी प्रभावीपणे लक्ष ठेवण्यात खूप त्रास होत होता. त्यामुळे विभागांतर्गत दृकश्राव्य (Video Conferencing) माध्यमाची सोय उपलब्ध करून द्यावी अशी मागणी सगळीकडून येत होती. व्हिसीद्वारे एक State of the art तंत्रज्ञान आपण विभागासाठी विकसित करतो आहोत. या प्रणालीचे उद्घाटन प्रधान सचिवद्वय यांनी मंत्रालय व वाल्मी औरंगाबाद येथून एकमेकांशी संवाद साधून दि. १९ जुलै २०१४ रोजी केलेले आहे.

भविष्यात वाल्मी औरंगाबाद व मअप्रप्र नाशिक यांचेमार्फत संबंधित अधिकाऱ्यांसाठी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे शक्य होणार आहे. गतवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील ई-जलसेवा अभियान-२०१४ ते १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर २०१४ या कालावधीमध्ये राज्यभर राबविण्याचे नियोजन करण्यात येत आहे. हे अभियान प्रणालीचा वापर या केंद्रीय संकल्पनेशी निगडीत असणार आहे. आपणांस विनंती करण्यात येते की, या अभियानासाठी वेगवेगळ्या कल्पना सूचवाव्यात व आपले अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांना देखील याबाबत अवगत करावे.

ई-जलसेवा प्रणाली हा विभागाचा मानबिंदू असून दिवसेंदिवस विभागातील कामकाज अधिक कार्यक्षम करण्याकडे एक एक पाऊल उचलण्यात येत आहे. या प्रणालीचा अधिकाधिक वापर करावा असे आवाहन करून प्रणालीच्या यशाबद्दल आपणांस शुभेच्छा देतो!

## जलसंपदा विभागाच्या दृकश्राव्य (VC) माध्यमातून राज्याचे मा.मुख्य सचिव यांचे सरळसेवा प्रविष्ठ सहा.अभियंता-२ यांना मार्गदर्शन



श्री. जे. एस. सहारिया
मुख्य सचिव
महाराष्ट्र राज्य

दि. १० एप्रिल २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये जलसंपदा विभागामध्ये नवनियुक्त सहाय्यक अभियंता श्रेणी-२ यांचेकरीता १ वर्षाच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून या अनुषंगाने प्रथम तुकडी दि. १४ जुलै २०१४ पासून प्रतिष्ठापन प्रशिक्षणासाठी प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रात दाखल झालेली आहे.

दि. २५ जुलै २०१४ रोजी सकाळी १०.३० ते ११.०० या दरम्यान महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्य सचिव श्री. जे. एस. सहारिया यांनी याच दृकश्राव्य माध्यमाद्वारे जल व भूमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद परिसरातील प्रादेशिक प्रशिक्षण संस्थेमध्ये पहिल्याच प्रतिष्ठापन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी उपस्थित झालेल्या सहाय्यक अभियंता श्रेणी-२ या तुकडीसोबत संवाद साधला व त्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. यावेळी मंत्रालयात जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव श्रीमती मालिनी शंकर, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद येथे महासंचालक श्री. हि. ता. मेंढेगिरी, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक येथे महासंचालक श्री. पी. आर. भामरे तर कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे येथून श्री. ता. ना. मुंडे यांचेसह इतर अधिकारी वर्ग सहभागी झाले होते.

मा. श्री. जे. एस. सहारिया, मुख्य सचिव यांनी यावेळी नवनियुक्त प्रशिक्षणार्थी यांना मार्गदर्शक करताना प्रमुख तीन बाबी विशेद केल्या. पहिली म्हणजे शासकीय सेवेमध्ये वेतन खाजगी क्षेत्रापेक्षा कमी असले तरीही आपल्याला समाजसेवा करण्याची संधी यातूनच उपलब्ध होत असून कामकाजाच्या विस्तृत कक्षा व क्षेत्रीय स्तरावर स्वातंत्र्य प्राप्त झालेले असते व ते अधिक महत्त्वाचे आहे, हे सांगून आपल्याला काम करताना आवश्यक ती सर्व साधन सामुग्री उपलब्ध करून दिलेली असते, त्यामुळे आपली इच्छाशक्ती असल्यास आपणास समाजाची सेवा करता येईल. जलसंपदा विभागाने आतापर्यंत अनेक चांगले प्रकल्प राबविले असून कोयना, जायकवाडी ही त्याची उदाहरणे असून भारताचे माजी पंतप्रधान स्व. जवाहरलाल नेहरू यांनी धरणे ही आधुनिक भारताची तिर्थक्षेत्रे आहेत असे म्हटले होते, असे विशद करून मा. मुख्य सचिव यांनी आपण देखील आपल्या सेवेच्या कालावधीत चांगले काम करावे याबाबत प्रेरणा दिली.

त्यानंतर दुसरा मुद्दा मांडतांना मा. मुख्य सचिव यांनी शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी केवळ आपल्या पदश्रेणीपुरता किंवा विभागापुरताच संकुचित विचार न करता इतर विभागांशी सुसंवाद प्रस्थापित करावा, त्यांचा आपल्या विषयीचा दृष्टीकोन जाणून घ्यावा, असे झाल्यास राज्य शासनाचे १५ ते १६ लक्ष अधिकारी-कर्मचारी राज्यातील ११कोटी जनतेप्रती उत्कृष्ट सेवा पुरविण्यास कटीबद्ध राहतील व त्यायोगे जनतेच्या अपेक्षा पूर्ण करू शकतील, असे सांगितले.

नवनियुक्त अभियंत्यांना तिसरा आणि शेवटचा मुद्दा सांगताना मा. मुख्य सचिव यांनी सेवा कालावधीमध्ये सत्याची कास धरून दुरमागी समाधान मिळवून देणाऱ्या मार्गाचा अवलंब करावा व आपल्या कृतीमधून उदाहरण दाखवून द्यावे असे सांगून अभियंत्यांना सकारात्मक कामासाठी आवाहन केले.

यानंतर मा. मुख्य सचिव यांनी मअप्रप्र नाशिक तसेच वाल्मी औरंगाबाद या संस्थेचे प्रमुख यांच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करून नवनियुक्त अभियंत्यांसोबत संवाद साधला. शासकीय सेवेच्या पहिल्याच टप्प्यात राज्यातील शासकीय सेवेच्या सर्वोच्च पदावरील अधिकाऱ्याने केलेल्या मार्गदर्शनाचे नवनियुक्त अभियंत्यांनी स्वागत केले व त्याचे आभार मानले.

(शब्दांकन : श्री. प्रविण कोल्हे, कार्यकारी अभियंता)

# जलसंपदा विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी ई-जलसेवा विशेष कार्यशाळेचे वाल्मी येथे आयोजन



कार्यशाळेमध्ये सहभागी झालेल्या अधिकाऱ्यांसमवेत प्रधान सचिव श्रीमती मालिनी शंकर, वाल्मी औरंगाबाद महासंचालक श्री. हि.ता. मेंढेगिरी, कार्यकारी संचालक श्री. चं. स. बिराजदार, मुख्य अभियंता सर्वश्री जोगदंड, श्री. ननवरे, श्री. निकुम,श्री. घोटे व अधिक्षक अभियंता श्री. टी. एन. मुंडे.

माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शासकीय कामकाज कार्यक्षम होऊन सर्वसामान्य जनतेला माफत दरात, प्रभावी, पारदर्शक रितीने व जलदगतीने सेवा पुरविण्याच्या दृष्टीने जलसंपदा विभागाने ई-जलसेवा हा प्रकल्प हाती घेतला असून प्रकल्प १ मे २०१३ पासून कार्यान्वित झाला आहे. या प्रकल्पामुळे जलसंपदा विभागाच्या कामकाजामध्ये तसेच सिंचन प्रकल्प अंमलबजावणी आणि माहितीमध्ये एकसूत्रता, एकरूपता व सुसंगतपणा येण्यास हातभार लागणार आहे. राज्यातील जलविषयक माहिती एककेंद्रित करून त्याचा सर्वांगीण वापर जल-व्यवस्थापन विषयक धोरण निश्चित करणे, त्याची यथासांग अंमलबजावणी करणे, निर्णयप्रक्रियेसाठी सहाय्य मिळणे, कागदपत्रांचे डिजिटल स्वरूपात जतन करणे या गोष्टी यातून साध्य होणार आहे. ई-जलसेवा प्रकल्पामध्ये अचूक माहिती भरून शासकीय कामकाजात प्रणालीचा वापर करणे सुलभ व्हावे यासाठी प्रणालीची सखोल ओळख सर्व स्तरावर होणे आवश्यक आहे. मास्टर ट्रेनर्स तसेच मअप्रप्र, नाशिक येथे आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे या प्रणालीची माहिती वापरकर्त्यांपर्यंत देण्यात आली आहे. याच अनुषंगाने कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे तसेच वाल्मी, औरंगाबाद यांचे संयुक्त विद्यमाने दि. १८ व १९ जुलै २०१४ दरम्यान जलसंपदा विभागातील अधीक्षक अभियंता यांचेकरीता SWeSO या दोन दिवसीय विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यशाळेकरीता मंत्रालयातील सहसचिव व उपसचिव यांचेसह क्षेत्रीय स्तरावरील अधीक्षक अभियंता यांनी सक्रिय सहभाग नोंदवला असून कार्यशाळेकरीता दोन मुख्य अभियंता व ३१ अधीक्षक अभियंता सहभागी झाले होते. कार्यशाळेचे उद्घाटन करताना जल व भूमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद संस्थेचे महासंचालक श्री. हि. ता. मेंढेगिरी यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले व ई-जलसेवा प्रणालीचे सखोल ज्ञान आत्मसात करून विभागातील अधिकाधिक कामकाज प्रणालीमार्फत करण्याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर श्री. मुंडे, अधीक्षक अभियंता,यांनी उपस्थितांना ई-जलसेवा प्रणालीची आवश्यकता व त्याचे फायदे विशद केले. कार्यक्रमाचे समन्वयक श्री. प्रविण कोल्हे, कार्यकारी अभियंता (बदल व्यवस्थापन) यांनी ई-जलसेवा प्रणालीबाबत माहिती दिली. या प्रणालीच्या माध्यमातून जलसंपदा विभागाचा सुशासनाकडे प्रवास सुरू झाला असल्याचे सांगितले.

कार्यशाळेमध्ये उपस्थितांना हॅन्डस् ऑन प्रशिक्षण देण्यात आले आणि विविध व्याख्यानाच्या माध्यमातून त्यांना मोड्यूलमध्ये भरलेली माहिती, त्याची पडताळणी व त्याचा योग्य वापर याबाबत माहिती देण्यात आली. प्रशिक्षणार्थींना प्रणालीची ओळख करून देणे व त्यांच्या अडचणींचे निवारण करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय पुणे येथील श्रीमती पौर्णिमा देसाई, कार्यकारी अभियंता, श्रीमती धनश्री लिमये, श्री. नंदकिशोर रणवरे, श्री. अविनाश पाटील, श्री. प्रशांत कदम तसेच मास्टर ट्रेनर्स श्री. विशाल खैरनार व श्री. तुषार चिनावलकर हे उपस्थित होते.

दि. १९ जुलै २०१४ रोजी प्रधान सचिव श्रीमती मालिनी शंकर यांनी उपस्थितांशी संवाद साधला व प्रणालीमधून माहिती काढण्याबाबत प्रात्यक्षिक करून घेतले. यावेळी संवाद साधताना मा. प्रधान सचिव यांनी राज्यातील जल विषयक माहिती एककेंद्रीत करून त्याचा सर्वांगीण वापर जलव्यवस्थापन विषयक धोरण निश्चित करणे, त्याची यथासांग अंमलबजावणी करणे, निर्णय प्रक्रियेसाठी सहाय्य मिळणे, कागदपत्रांचे डिजिटल स्वरूपात जतन करणे इ. गोष्टी साध्य होणार असून विभागामध्ये इतरत्र उपलब्ध माहितीचा एककेंद्रीय स्त्रोत निर्माण करण्यास ई-जलसेवा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे, असे प्रतिपादन केले. तसेच या प्रणालीचा फायदा मंत्रालयस्तरावर सर्वांत जास्त होणार असून कोणतीही माहिती काही क्षणात उपलब्ध होणार असून मोठी सोय होणार आहे. असे मत मुख्य अभियंता श्री. घोटे व श्री. निकुम यांनी व्यक्त केले. ई-जलसेवा प्रणालीच्या कामाला शुभेच्छा देऊन कार्यशाळेची सांगता झाली. SWeSO ही दुसरी कार्यशाळा वाल्मी औरंगाबाद येथे लवकरच आयोजित करण्यात येणार आहे.

# जलसंपदा विभागामध्ये जिल्हास्तरापर्यंतची अत्याधुनिक दृकश्राव्य (Video Conferencing) सेवा कार्यरत



दृकश्राव्य सेवेद्वारे मंत्रालयात उपस्थित मा. ई. बी. पाटील, प्रधान सचिव यांच्याशी संवाद साधताना वाल्मी औरंगाबाद येथे उपस्थित मा. मालिनी शंकर, प्रधान सचिव, महासंचालक श्री. मेंढेगिरी, कार्यकारी संचालक श्री. चं. स. बिराजदार व उपस्थित अधिकारी.

जलसंपदा विभागात काम करत असताना बहुतांश वेळ बैठका व त्यासाठी करावा लागणाऱ्या प्रवासासाठीच जात असायचा व त्यामुळे क्षेत्रीय कामकाजाकडे वेळेअभावी प्रभावीपणे लक्ष ठेवण्यात खूप त्रास होत होता. त्यामुळे विभागांतर्गत दृकश्राव्य (Video Conferencing) माध्यमाची सोय उपलब्ध करून द्यावी अशी मागणी सगळीकडून येत होती. व्हिसीद्वारे एक State of the art तंत्रज्ञान आपण विभागासाठी विकसित करण्यात येत आहे. या मुळे निश्चितच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकांसाठी जिल्हा मुख्यालयी उपस्थित राहून कार्यालयीन व तांत्रिक कामकाजावर प्रभावी नियंत्रण ठेवून अधिक कार्यक्षम कामकाज करणे शक्य होणार आहे. या प्रणालीचे उद्घाटन विभागाचे प्रधान सचिवद्वय यांनी मंत्रालय व वाल्मी औरंगाबाद येथून एकमेकांशी संवाद साधून दि. १९ जुलै २०१४ रोजी केले आहे.

**ई-जलसेवा वृत्तांत**

1. New version of WRD portal launched on 14/7/2014
2. Hon Chief Secretary addressed newly recruited batch of AE II at META RTC Aurangabad through video conferencing
3. Commissioning of Video Conferencing solution at Mantralaya, Walmi, Meta and KDC & Other District Location.
4. First batch of eJalseva workshop for Superintending Engineer level (SWeSO) successfully completed on 18th and 19th 2014 at WALMI, Aurangabad
5. Second batch of SWeSO is planned shortly in August 2014
6. Data entry of pilot activity of eService book completed at KDC, Pune and validation of data is in progress